॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ७ ऑक्टोबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'युवारंग' विद्यापीठ युवक महोत्सवाअंतर्गत विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण विचार, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी 'युवास्पार्क २०२६' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माहितीपत्रकाचे अनावरण दि. ७ ऑक्टोबर रोजी कुलगुरू कार्यालयात करण्यात आले.

विद्यार्थ्यांमधील नवोपक्रम, उद्योजकता, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुणांना चालना देण्याबरोबरच त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना योग्य दिशा देऊन त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून देणे, हा 'युवास्पार्क २०२६'चा प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवोपक्रम, स्टार्टअप आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातील विविध संधींची माहिती मिळणार असून, त्यांच्या कल्पनांचा व्यवसायाभिमुख विकास करण्यासाठीही प्रोत्साहन दिले जाणार आहे.

यावेळी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी 'युवास्पार्क' उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्यासाठी तसेच नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून व्यापक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

**११ कल्पनांना वर्षभर विनामूल्य इनक्युबेशन** : 'युवास्पार्क २०२६'चे विशेष आकर्षण म्हणजे स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय स्पर्धेतील उत्कृष्ट ११ नाविन्यपूर्ण कल्पनांची अंतिम निवड करण्यात येणार असून, या निवडक कल्पनांना केसीआयआयएल च्या माध्यमातून एक वर्षासाठी विनामूल्य इनक्युबेशन सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

इनक्युबेशनच्या कालावधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचा विकास करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, मेंटरशिप, व्यवसायविकास सहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन तसेच स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पना केवळ स्पर्धेपुरत्या मर्यादित न राहता त्यांचे प्रत्यक्ष नवोपक्रम, उत्पादने किंवा व्यवसायाच्या स्वरूपात रूपांतर करण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. 'युवास्पार्क २०२६'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या-निराकरण करणाऱ्या कल्पना मांडण्याची तसेच त्यावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. नवकल्पनांना व्यवसायाभिमुख दृष्टिकोन देऊन त्यातून भविष्यातील स्टार्टअप आणि उद्योग उभारणीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशील विचार, नवोपक्रमाची मानसिकता आणि उद्योजकीय कौशल्ये विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच स्थानिक पातळीवरील समस्या आणि गरजा लक्षात घेऊन त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार आहे.

या प्रसंगी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यापीठ अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. प्रवीण महाले, तसेच केसीआयआयएलचे संचालक डॉ. राजेश जवळेकर, सीए रवींद्र पाटील, प्रा. डॉ. अरुण इंगळे उपस्थित होते.

'युवास्पार्क २०२६'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवकल्पना, उद्योजकता, स्टार्टअप आणि उद्योग क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्यातील नवोन्मेषी क्षमतांना चालना देणे आणि भविष्यातील उद्योजक, नवोपक्रमक तसेच समस्या-निराकरण करणारे युवा नेतृत्व घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी 'युवास्पार्क २०२६'मध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेत आपल्या नाविन्यपूर्ण कल्पनांना योग्य दिशा देत नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या प्रवासाची सुरुवात करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ७ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेत गांधी सप्ताहानिमित्त विचारधारा प्रशाळा व महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने मूकबधिर विद्यालय, जळगाव येथील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'संकेत संवाद स्पर्धा' आयोजित करण्यात आली.

यावेळी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक तथा महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडीया, मुख्याध्यापक हेमंत मुंदडा, निशांत शेख उपस्थित होते. परीक्षक म्हणून कला व मानव्यशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार व डॉ. वीणा महाजन यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत अब्बुकर मुस्तकीम पिजोरी, हिरफा आरिफ खान, शिफा आबिद लोहार, रागीणी शांताराम भराडे व अनुराग रामदास धनगर यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक डॉ. उमेश गोगडीया यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. म. सु. पगारे यांनी मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन इशिका गुप्ता यांनी केले, तर आभार प्रा. रोशन मावळे यांनी मानले. उपक्रमासाठी सहाय्यक प्राध्यापक योगेश माळी व प्रा. मोईन शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी डॉ. विजय घोरपडे, डॉ. दिगंबर सावंत, डॉ. मनोज इंगोले, डॉ. अभय मनसरे, डॉ. समाधान कुंभार, डॉ. सुषमा तीनगोटे, डॉ. शीतल पाटील, डॉ. पोर्णिमा वाहने, सायली बडगुजर, डॉ. गजानन देशमाने, डॉ. ज्ञानोबा सोनटक्के, डॉ. गोपाळ पाटील, प्रा. विनेश पावरा, प्रा. वीरेश पाटील, प्रा. विशाल सपकाळे, डॉ. दीपक खरात, विजय कोळी, गौरव हरताळे, योगेश चौधरी, खेमराज पाटील व सुकन्या जाधव यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ७ ऑक्टोबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**